CR1980042407

महाराष्ट्र शासकीय कर्मचारी घरबांधणी अग्रिम नियम, १९६२ अन्वये मंजूर केलेल्या अग्रिमांच्या रकमेवरील व्याजाची तत्परतेने वसुली.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
परिपत्रक क्रमांक एचबीए १०८०/५९/जीईएन-५
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ एप्रिल १९८०.

## परिपत्रक

शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, कांही प्रकरणी जेथे शासकीय कर्मचाऱ्यांना मुंबई वित्तीय नियमांन्वये अग्रिम मंजूर करण्यात आले होते अशा कर्मचाऱ्यांनी अग्रिमांच्या मुद्दलाची परतफेड ठोक रकमेत किंवा संबंधित आदेशांमध्ये निर्दिष्ट केलेल्या हप्त्यांच्या संख्येपेक्षाही कमी हप्त्यात केली. परंतु त्यांनी मुद्दलावरील व्याज भरण्यास लागलीच सुरुवात केली नाही. त्यासाठी सदर कर्मचाऱ्यांनी असे कारण पुढे केले की, त्यांच्या करारपत्रातील अटींनुसार व्याजाचे हप्ते भरण्याची सुरुवात बऱ्याच कालावधीनंतर करावयाची आहे.

२. घरबांधणी अग्रिम नियम, १९६२ मधील नियम १४ च्या पोट नियम (ब) या अन्वये कर्ज घेणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याची जर तशी इच्छा असेल, तर त्याला त्याने घेतलेल्या अग्रिमाची कमी कालावधीत परतफेड करण्याची मोकळीक आहे. पोट नियम (क) मध्ये अशी तरतूद आहे की मुद्दलाचा शेवटचा हप्ता ज्या महिन्यामध्ये परत फेडावयाचा असेल त्या महिन्यानंतर येणाऱ्या महिन्यापासून व्याजाची वसुली सुरु झाली पाहिजे. म्हणून शासकीय कर्मचाऱ्यांकडून एकदा मुद्दल वसूल झाल्यानंतर त्यांच्याकडून व्याजाच्या वसुलीस विलंब लावणे योग्य ठरत नाही.

३. म्हणून शासन असा निदेश देत आहे की विभाग प्रमुखांनी घरबांधणी अग्रिम मंजूर करणाऱ्या आदेशामध्ये विनिर्दिष्टपूर्वक असे नमूद केले पाहिजे की, ज्या प्रकरणात घरबांधणी अग्रिमाची ठोक रकमेमध्ये परतफेड करण्यात येईल अथवा सदर आदेशातील अटींनुसार मान्य झालेल्या हप्त्यांच्या संख्येपेक्षा कमी हप्त्यांमध्ये परतफेड करण्यात येईल अशा प्रकरणात सुध्दा ज्या महिन्यामध्ये संपूर्ण मुद्दलाची परतफेड होईल त्या महिन्यानंतर येणाऱ्या महिन्यापासून व्याजाची वसुली सुरु करण्यात येईल. अशा प्रकरणी व्याजाची वसुली ज्या महिन्यात मुद्दलाची पूर्णपणे परतफेड झाली असेल त्या महिन्यानंतरच्या महिन्यापासून व्याजाची वसुली सुरु करण्यात आली आहे, या गोष्टीची त्यांनी खात्री करुन घेतली पाहिजे. मुंबई वित्तीय नियमांत विहित केल्याप्रमाणे लेखापरीक्षा विभागाने व्याजाची रक्कम आकारणीवरुन काढेपर्यंत अग्रिम मंजूर करणाऱ्या विभाग प्रमुखांनी देय असलेल्या व्याजाची अंदाजे रक्कम काढावी आणि व्याजाची वसुली सुरु करावी. शासकीय कर्मचाऱ्याने एकदा मुद्दलाची परतफेड केल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत देय असलेल्या व्याजाची वसुली लांबणीवर टाकण्यात येऊ नये. विभाग प्रमुखांना असे निदेश देण्यात येत आहेत की त्यांनी लेखा परीक्षा विभागाशी संपर्क साधावा आणि कर्ज घेणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याने देय असलेल्या व्याजाच्या रकमेची त्यांच्याकडून तत्परतेने पडताळणी करुन घ्यावी.

४. ह्या आदेशाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

व्ही.ए.कल्याणकर,
शासनाचे अवर सचिव,
वित्त विभाग.

प्रति

महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई (१६० प्रती),
महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (६० प्रती),
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (४० प्रती),
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
राज्यपालांचे सचिव,
राज्यपालांचे सल्लागार,
*प्रबंधक, मूळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
मंत्रालयाचे सर्व विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
निवासी आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
संपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड फाईल, कार्यासन जीईएन-५, वित्त विभाग.

---

* पत्राद्वारे

क्रमांक                                        दिनांक

यांच्या माहितीसाठी व मार्गदर्शनासाठी प्रत पाठविण्यात येत आहे.

एच-७२(७,०००+५-५-८०)-१३